(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XII / Issue – I ISSN 2277-8063

# महात्मा गांधीजींचे धर्मविषयक विचार

**दत्तात्रय दादासो जाधव,** संशोधक विद्यार्थी,राज्यशास्त्र विभाग,शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

महात्मा गांधी हे २० व्या शतकातील एक महत्वपूर्ण कृतीशील राजकीय विचारवंत होते.त्यांनी भारतीय लोकांना दिलेला 'रचनात्मक कार्यक्रम' हा अमुलाग्र असा आहे.भारतीय लोकांच्यात निर्माण झालेल्या राष्ट्रवादी भावनांना कृतीप्रवन करण्यात या विचारांचे मोलाचे योगदान आहे.गांधीजींनी धर्मविषयक घेतलेली भूमिका प्रवाही होती; त्याबद्दलचे विवेचन पुढीलप्रमाणे.

**संज्ञा**

हिंद स्वराज्य,नीती ,राजकारणाचे आध्यात्मिकिकरण,अहिंसा,सर्वधर्मसमभाव

**उद्देश**

प्रस्तुत संशोधन निबंधाचे खालील उद्देश आहेत.

१.हिंदू म्हणजे काय?हे समजून घेणे

२.धर्म आणि राजकारण यांचा सहसंबंध अभ्यासणे.

**गृहीत्तके**

प्रस्तुत संशोधन निबंधाचे संशोधकाने खालील गृहीतके गृहीत धरली आहेत.

१. अहिंसेचे पालन करतो तो हिंदू होय.

२. राजकरणात धर्म असायला हवा.

१) सनातनी हिंदू-

गांधी हे हिंदू धर्मीय होते.त्यांच्यावर त्यांच्या आईमुळे जैन तत्वज्ञानाचा प्रभाव पडला होता.ते स्वतःला सनातनी हिंदू मानत होते. पण त्यांचा 'सनातन' याचा अर्थ आपल्या समजूती प्रमाणे नव्हता. 'सनातनी ब्राह्मण' या शब्दात जो अर्थ आपल्याला बहुधा दिसतो तो फार वेगळा व चुकीचा असतो. खरे तर 'सनातन'चा शब्दकोशातील अर्थ 'शाश्वत', 'चिरंतन' असा आहे. जी मूल्ये चिरंतन आहेत, शाश्वत आहेत ज्यांना काळसुद्धा किंचितही धक्का लावू शकणार नाही "अशी मूल्ये म्हणजे 'सनातन' मूल्य. हिंदू धर्मातील अशाच मूल्यांचे आणि तत्त्वांचे गांधीजी खंदे पुरस्कर्ते होते.

२)धर्म व निती

गांधीजींच्या धर्म संकल्पनेत नीती व नीतियुक्त आचरणास फार-फार मोठे स्थान आहे. ते म्हणत की धर्म आणि नीती जणू एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. नीतिशिवाय धर्माचे अस्तित्व असू शकत नाही आणि धर्माशिवाय नीती-विकास; महाकठीण. गांधीजींनी 'धर्म नीती' असे एक पुस्तकच दक्षिण आफ्रिकेत प्रसिद्ध केले.

३)सर्वधर्मसमभाव/धार्मिक मानवतावाद

गांधीजिंच्या मते "सर्वधर्मसमभाव' हेच तत्त्व शाश्वत व सनातन असू शकते. या सर्वधर्मसमभावाच्या मूल्यामुळेच सहिष्णुता सारखे गुण वाढीला लागतात. जगाला शांततेची गरज लक्षात येऊ शकते हे ही आपण पाहात आहोत. जगासाठी मानवासाठी अशा सनातन मूल्यांवरील विकास हाच खरा विकास आहे.

४)प्रवाही धर्म

गांधी हरिजन यात्रेत म्हणले होते की,"मी जे करत आहे त्याने तुमच्या हिंदू धर्माचा नाश होत असेल तर होऊ द्या.मला त्याची चिंता नाही.मी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आलेलो नाही .मी तर या धर्माचा चेहरा-मोहराच बदलू इच्छितो. " म्हणजे गांधीजी धर्मात बदल करू इच्छित होते.

५)धार्मिक अहिंसा अमान्य

गांधीजींना धार्मिक हिंसा अमान्य होती.ते म्हणत,"जगात सर्वात जास्त हिंसा धर्माच्या नावाने होते.इंग्रजांच्या राखेतून आलेले स्वराज्य मला नको." असे ते नेहमी म्हणत असत.

६)सत्य हाच खरा धर्म

गांधीजींच्या मते,"ईश्वर सत्य आहे.आणि सत्य हाच खरा धर्म होय.ते सत्यवचनी होते.

७)खरा हिंदू कोण?

खरा हिंदू कोण?याचे उत्तर देताना गांधी संत कवी नरसिंह मेहता यांचा दाखला देत.मेहता लिहतात........

II वैष्णव जन तो तेणे रे कहीए

जे पिड पराई जाणे रे II

म्हणजे दुसऱ्या चे दुःख ज्याला कळते तो खरा हिंदू होय.हिंसेने दुःखी होतो तोच खरा हिंदू होय असे महात्मा गांधी यांचे म्हणणे होते.

८)'हिंदू स्वराज्य' नव्हे तर 'हिंद स्वराज्य'

गांधीजीना हिंदू राष्ट्र कल्पना अमान्य होती.त्यांना हिंदू राष्ट्र निर्माण करायचे असते तर त्यांनी एका प्रवासात लिहलेल्या पुस्तकाचे शिर्षक 'हिंद स्वराज्य' असे लिहले नसते.

९)राजकारणाचे आध्यात्मीकरण

गांधीजीनी धर्माला राजकारणात आणले.त्यांच्या लेखी धर्म म्हणजे निति होय.राजकारणात त्यांना नैतिकता आवश्यक वाटत होती."शरीराला जशी आत्म्याची आवश्कयता तशी राजकारणात धर्माची आवश्यकता आहे."त्यांनी राजकारणाचे आध्यात्मिकीकरण केले.राजकारणात धर्माला म्हणजे नीतीला स्थान देयून महात्मा गांधी यांनी राजकारणाचे शुद्धीकरणच केले आहे.

**गृहीतकांची पडताळणी**

१.अहिंसेचे पालन करतो तो हिंदू होय.

महात्मा गांधी हिंदू ची व्याख्या हिंसेने दुःखी होतो तोच खरा हिंदू अशी करत असत.म्हणून अहिंसेचे पालन करतो तो खरा हिंदू होय.हे गृहीतक सिद्ध होते.

२.राजकरणात धर्म असायला हवा.

महात्मा गांधी यांच्या लेखी धर्म म्हणजे नीती होय.राजकारण करत असताना नैतिकतेने करायला हवे.अशी गांधीजींची धारणा होती.राजकारणात धर्म असायला हवा हे गृहीतक सिद्ध होते.

कालप्रवाहाच्या वाटचालीदरम्यान हिंदू धर्मामध्ये घुसून स्थान मिळवलेल्या अनेक हीन दर्जाच्या बाबींना गांधीजी जाहीरपणे पायदळी तुडवत. उदाहरणार्थ उच्चनीचभाव, स्पृश्यास्पृश्य भाव, ऐषाराम, सोयीसुविधांची लालसा , स्त्रियांना केवळ भोग्य वस्तू म्हणून दिली जाणारी कनिष्ठ दर्जाची वागणूक, व्यसनाधिनता, सतीप्रथा, बालविवाह, विधवा स्त्रियांचा छळ, असे कितीतरी सांगता येतील. गांधीजी हे सर्व फक्त बोलून दाखवत नव्हते.तर या सर्व बाबींवर त्यांनी कृतीशील कार्यक्रम आखला होता.

**निष्कर्ष**

१.अहिंसा म्हणजे धर्म होय.

२.धर्म आणि राजकारण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**संदर्भ**

१.मेणसे आनंद(२०१९),गांधीजी दादा पुरव रिसर्च अंड ट्रेनिंग इन्स्टिट्यूट,पुणे

२.गांधी महात्मा ,(२००६)हिंद स्वराज्य,दत्ता शिंदे प्रकाशक,कोल्हापूर

३.धर्माधिकारी भाउ (संपा.१९९४)गांधी विचार दर्शन :धर्मविचार,पृथ्वीराज प्रकाशन,पुणे

४.दामले प्र.रा.(१९७६)महात्मा गांधीजी:व्यक्तिमत्व,कार्य आणि शिकवण,शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,कोल्हापूर

५.धर्माधिकारी तारा ,(२०१३)हिंदू धर्म म्हणजे काय ?,नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया ,नवी दिल्ली